सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर
जुने मॉरीस कॉलेज इमारत, नागपूर
क्रमांक:– उशिनाग/पदमान्यता/९९४४/१२
दिनांक :– 22/11/12

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या

शंकरलाल अग्रवाल विज्ञान
महाविद्यालय सालेकसा जि. गोंदिया

विषय : अशासकीय महाविद्यालयातील सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या पदास मंजुरी देण्याबाबत. ( वर्ष : २०१२–१३)

संदर्भ :
१) नागपूर विद्यापीठ,नागपूर पत्र क्र.ॲसी/सीओ/सी/४८७, दिनांक १९/०८/१९७६
२) एनजीसी:२०८०/१६०२८४(५९८७)–युएनआय–२, दिनांक १/६/८१
३) शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२८६/(१२२४)/विशि–४, दिनांक २७/२/१९८९.
४) शासन निर्णय क्र.युएसजी/१०९३/(५९१८)माशि–२, दिनांक १७/५/९४
५) शासन निर्णय क्र.एनजीजी/१०९३/(५९१८)माशि–३, दिनांक १९/६/९५
६) शासन निर्णयक्र.युएसजी/१९९६/३४२४/प्र.क्र.४०९९/विशि–४, दिनांक २२/५/९६
७) शासन निर्णय क्र.युएसजी/१२९२/२६४७/विशि –४, दिनांक १६/१०/१९९७
८) शासन निर्णय दिनांक ११/१२/१९९९
९) शासन निर्णय क्र.संकीर्ण–२०११/(२५/११)विशि–१, दिनांक १५/२/२०११
१०) शासन निर्णय क्र.एनजीसी२०१०(४१५/१०)–विशि–१, दिनांक २६/१०/१०
११) मा.शिक्षण संचालक, पुणे यांचे दिनांक ११/८/२०११चे पत्र
१२) आपला प्रस्ताव क्र. दिनांक

महोदय/महोदया,

दिनांक १७/५/९४ चे शासन निर्णयान्वये सहसंचालक,उच्च शिक्षण यांना अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सहा. प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक पदांना मंजुरी देण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. या आदेशाचे अधिन राहून व उपरोक्त संदर्भांकित क्रमांक १ ते ९ चे आदेशानुसार विषयनिहाय कार्यभार निश्चित करण्यात येत आहे. तसेच तद्नुषंगाने पुढीलप्रमाणे विषयनिहाय पदमान्यता २०१२ – १३ या वर्षाचे स्थिर विद्यार्थी संख्येच्या आधारावर करून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विषय | विद्यार्थी संख्या | एकूण कार्यभार तासिकांमध्ये | एकूण अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अतिरिक्त पदे | सहयोगी प्राध्यापक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | प्राचार्य | २४८ | ०५ | १ | ०१ | ०० | – | – | – |
| २. | शारीरिक शिक्षक निर्देशक | २४८ | २३ | ०१ | – | ०१ | – | – | – |
| ३. | ग्रंथपाल | २४८ | – | १ | – | ०१ | – | – | – |
| ४. | प्राध्यापक रसायनशास्त्र | २४८ | ११४ | ०६ | – | ०६ | – | – | – |

Scanned by CamScanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | प्राध्यापक वनस्पतीशास्त्र | २४८ | ११४ | ०६ | — | ०६ | — | — | — |
| ६. | प्राध्यापक प्राणीशास्त्र | २४८ | ११४ | ०६ | — | ०६ | — | — | — |
| ७. | प्राध्यापक इंग्रजी | २४८ | ७० | — | — | — | — | — | — |
| ८. | प्राध्यापक | २४८ | ०३ | — | — | — | — | — | — |
| | एकूण पदे | | | २१ | ०१ | २० | - | - | - |

प्राध्यापकांची पदे पुढीलप्रमाणे अनुज्ञेय राहतील:—

<u>एकूण सहयोगी प्राध्यापक,</u>

१. सहयोगी प्राध्यापकांची मंजूर पदसंख्या :—

२. एकूण सहयोगी प्राध्यापक पदांच्या १० टक्के :—

३. गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने भरावयाचा कोटा — (७५टक्के):— पूर्णांक:—

४. सरळसेवेने/प्रतिनियुक्तीने भरावयाचा कोटा — (२५टक्के):— पूर्णांक:—

<u>एकूण प्राध्यापक पदे</u>

dc

सहसंचालक,उच्च शिक्षण
नागपूर विभाग,नागपूर.

नियमानुसार नियुक्त सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या पदावरील खर्च अनुदानास पात्र धरण्यात येईल. आपले महाविद्यालयास पुढील अटीने अधिन राहून पदे अनुज्ञेय आहेत.

Scanned by CamScanner

१) आपल्या महाविद्यालयातील अनुदानित तुकडयांमधील आपण दाखविलेली वर्षनिहाय/वर्गनिहाय विद्यार्थी संख्या ही प्रत्यक्षत पदावर असणे आवश्यक आहे.

२) व्याख्याते/टयुटरियल यासाठी दाखविलेल्या तासिका संबंधीत सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांनी वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष घेणे आवश्यक आहे.

३) मान्य पदावर नियुक्त केलेल्या सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांनी शासनाने वेळोवेळी निर्धारीत केल्याप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाचे शिफारसीनुसार शासनाने मान्य केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त असणे आवश्यक आहे. तसेच या सहा. प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांचे नेमणूकीस विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे.

४) ही मान्यता पदांना वेतन अनुदान देण्याच्या संदर्भात आहे. त्या पदावरील नेमणूका अस्तित्वात असलेल्या विद्यापीठाच्या व शासनाच्या सर्व संबंधीत नियमानुसार केलेल्या असाव्यात.

५) विषयाची व विद्याशाखेची तुकडी किमान विद्यार्थी संख्या शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या १९ जून १९९५ च्या निकषानुसार असावी.

६) संबंधीत विषयाची/तुकडीची विद्याशाखेची मान्यता शासनाने अनुदान तत्वावर दिली असेल तरच तात्पुरता कार्यभार मान्य समजण्यात येईल.विना अनुदान तुकडयावरील सर्व खर्च अनुदान निर्धारण करतांना अमान्य करण्यात येईल. व अशा तुकडया/विषयाचा कार्यभार पदमान्यतेसाठी विचारात घेतला जाणार नाही.

७) कोणत्याही शैक्षणिक अर्हतेनुसार अपात्र व विद्यापीठाकडून मान्यता न मिळालेल्या तसेच बिना अनुदान तत्वावरील तुकडी/ विषयाच्या कार्यभारासाठी नियुक्त सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या वेतनावरील अनुदान देय होणार नाही.

८) अनुज्ञेय पदापेक्षा ज्यादा ठरणा-या सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या तसेच विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार उपलब्ध असतांनाही बिगर शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवाराची नियुक्ती केली असल्यास अशा अपात्र सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या वेतनावरील खर्च अनुदान निर्धारणासाठी ग्राहय मानल्या जाणार नाही.

९) दिनांक १/१०/२०१२ या वर्षाच्या स्थिर विद्यार्थी संख्येच्या आधारावरच विषयावर थेट मान्य करण्याचे आदेश असले तरी सन २०१२ – २०१३ वर्षात जी विद्यार्थी संख्या उपलब्ध आहे. त्या आधारावरच एखाद्या विषयाचे पद मान्य होत नसल्यास ते भरता येणार नाही.

१०) कार्यभार निर्धारणामध्ये चुकीची विद्यार्थी संख्या दर्शविल्या व त्यानुसार संबंधीत विषयाचे पद भरलेले असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत पदावरील केलेली नेमणूक त्यांचे वेतन प्राचार्य यांच्या पगारातून वसुल करण्यात येईल.

११) मागासवर्गीयांची भरती/पदोन्नती नियमाप्रमाणे/शासन आदेशाप्रमाणे झालेली आहे किंवा नाही याकरीता बिंदू नामावली तयार करुन विद्यापीठाच्या मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेणे आवश्यक आहे. व त्यानंतर शासन परिपत्रकदि.०५.११.२००९ प्रमाणे सहा. आयुक्त, मागासवर्गीय कक्ष यांचेकडून अंतीम मान्यता घेणे आवश्यक आहे

१२) सदर मंजुरी आदेशाबाबत काही आक्षेप असल्यास प्राप्त झाल्याचे दिनांकापासून <u>आठ</u> दिवसाचे आत अपील करावी, अन्यथा आपला आक्षेप ग्राहय होणार नाही

केवळ वरील सर्व अटीची पुर्तता करीत असलेल्या नियुक्त सहा.प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक यांच्या पदवारील खर्च अनुदानास पात्र धरण्यात येईल.

सहसंचालक,उच्च शिक्षण
नागपूर विभाग,नागपूर.

Scanned by CamScanner